डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१
barti
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० / २६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र./बार्टी/पुणे/योजना विभाग/एम.पी.एस.सी प्रशिक्षण/२०२३-२४ / ४४७ दि.२९/१/२०२४

# सूचना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या युवक-युवतींना **महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम** पुणे व नाशिक या ठिकाणी १२ महिने कालावधीसाठी नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण राबविण्यात येत आहे.

बार्टी-एम.पी.एस.सी (राज्यसेवा परीक्षा) पूर्व प्रशिक्षण २०२३ -२४ च्या चाळणी परीक्षेची तात्पुरती सुधारित निवड यादी व प्रतीक्षा यादी दिनांक २८ ऑक्टोबर २०२३ रोजी बार्टी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. तसेच ०६ नोव्हेंबर २०२३ ते ०९ नोव्हेंबर २०२३ व २१ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत कागदपत्रे तपासणी करून विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरु करण्यात आलेले आहे.

कागदपत्रे तपासणी दरम्यान अनुपस्थित विद्यार्थी व दुबार लाभार्थी यांची निवड रद्द करून त्या जागी पुणे करिता दिनांक १० जानेवारी २०२४ व नाशिक करिता १२ जानेवारी २०२४ रोजीच्या घोषणापत्रकाद्वारे प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक २३ जानेवारी २०२४ रोजीच्या घोषणापत्रकाद्वारे विशेष बाब अंतर्गत विद्यार्थाची निवड करण्यात आलेली आहे. उपरोक्त प्रमाणे निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्राची तपासणी दिनांक १२, १५ व २५ जानेवारी रोजी करण्यात आलेली आहे.

दिनांक १२, १५ व २५ जानेवारी रोजी कागदपत्रे तपासणी करिता अनुपस्थित विद्यार्थ्यांनी **दिनांक १ फेब्रुवारी २०२४ रोजी बार्टी मुख्यालयात हजर राहून कागदपत्राची तपासणी करावी.**

**स्थळ:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) येरवडा जेल रोड जवळ, लक्ष्मीनगर, कॉमर्स झोन आय.टी पार्क, येरवडा,पुणे-४११००६.

**वेळ :** - सकाळी ११.०० पासून ते सायंकाळी ५.०० पर्यंत

दिनांक १ फेब्रुवारी २०२४ रोजी जे विद्यार्थी अनुपस्थित राहतील अशा विद्यार्थ्यांची निवड रद्द करून त्याजागी प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी देण्यात येईल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

29/1/24

**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.**